असा. क्र. १५ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००१

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**बुधवार, फेब्रुवारी ७, २००१/माघ १८, शके १९२२**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सामान्य प्रशासन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ फेब्रुवारी २००१

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक मभाप. १०९७/१६५२/प्र. क्र. ७२/९७/२०-ब.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, " महाराष्ट्र शासकीय कर्मचारी (उच्च न्यायालयीन कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त) **मराठी** भाषा परीक्षा नियम, १९८७ " मध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना " महाराष्ट्र शासकीय कर्मचारी (उच्च न्यायालयीन कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त) **मराठी** परीक्षा (सुधारणा नियम, २०००) " असे म्हणावे.

२. महाराष्ट्र शासकीय कर्मचारी (उच्च न्यायालयीन कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त) **मराठी** भाषा परीक्षा नियम, १९८७ च्या नियम ४ मध्ये,—

(अ) पोट-नियम (१) नंतर, पुढील पोट-नियम समाविष्ट करण्यात येईल :—

" (१अ) जो शासकीय कर्मचारी शासकीय सेवेत दाखल झाल्यानंतर एक उच्चस्तरीय किंवा निम्नस्तरीय विषय म्हणून **मराठीसह** माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाला असेल आणि ज्यास ५० टक्क्याहून कमी गुण मिळाले नसतील अशा कर्मचाऱ्यास उच्चस्तरीय किंवा यथास्थिती निम्नस्तरीय परीक्षेच्या परीक्षा (पेपर) एक उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल."

(ब) पोट-नियम (२) व (३) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" (२) शासकीय कर्मचारी,—

(एक) ज्याने **मराठी** ही आपली मातृभाषा असा दावा सांगितला असेल, किंवा

(दोन) ज्याने, **मराठी** ही आपली मातृभाषा आहे असा दावा सांगितलेला नाही परंतु ज्याचे शिक्षण **मराठी** माध्यमातून झालेले आहे आणि जो मराठीसह माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा उच्चस्तरीय परीक्षा उत्तीर्ण झालेला नाही असा कर्मचारी,—

या नियमातून सूट मिळण्यासाठी पुढील शर्तींची पूर्तता करील :—

(अ) तो देवनागरी लिपीमध्ये सहजपणे लिहिण्यास समर्थ असला पाहिजे,

(ब) त्याने किमान ७ व्या इयत्तेपर्यंत **मराठी** माध्यमातून शिक्षण घेतलेले आहे अशा [illegible] प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे

आणि

(क) तो मराठीतून पत्रव्यवहार करू शकतो अशा आशयाचे विभाग प्रमुखांचे/कार्यालय प्रमुखांचे प्रमाणपत्र त्याने सादर करणे आवश्यक आहे.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मा. वि. कोकणे,**
**शासनाचे सहसचिव.**

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
उप मुख्य मंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
* महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

---

* पत्राने.

**मा. वि. कोकणे,**
सह सचिव
सामान्य प्रशासन विभाग.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 7th February 2001

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. MBHAP. 1097/1652/CR-72/97/XX-B.—In exercise of the powers conferred by the provision to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules to amend the Maharashtra Government Servants (Other than High Court Servants) *Marathi* Language Examination Rules, 1987, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Government Servants (Other than High Court Servants) *Marathi* Language Examination (Amendment) Rules, 1999.

2. In rule 4 of the Maharashtra Government Servants (Other than High Court Servants) *Marathi* Language Examination Rules, 1987,—

(*a*) after sub-rule (1) the following sub-rule shall be inserted, namely :—

"(1A) A Government servant who passes the Secondary School Certificate Examination after entering into the Government service, with *Marathi* as a higher standard or lower standard subject and obtains not less than 50 per cent. Marks, shall be exempted from passing paper I of the Higher Standard Examination or as the case may be, the Lower Standard Examination."

(*b*) for sub-rules (2) and (3) the following shall be substituted, namely :—

"(2) A Government servant,—

(*i*) who claims that his mother tongue is Marathi ; or

(*ii*) who does not claim that his mother tongue is *Marathi* but that he has studied in *Marathi* medium and who has not passed Secondary School Certificate or Higher Standard Examination with *Marathi*,

shall fulfill the following conditions for getting exemption from these rules :—

(*a*) he should be able to write with facile in *Devnagari* script ;

(*b*) he should produce a certificate from the cocerned institute indicating that he has taken education in *Marathi* medium at least upto 7th Standard ; and

(*c*) he should produce a certificate from the Head of Department/office that he can correspond in *Marathi*.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

M. V. KOKANE,
Joint Secretary to Government.



शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

To

The Secretary to the Governor,
The Secretary to the Chief Minister,
The Secretary to Deputy Chief Minister,
The Private Secretary to all Ministers, Ministers for State,
Chief Secretary/Additional Chief Secretary/Principal Secretary/Secretary,
* The Registrar, High Court of Judicature, Original Side, Mumbai,
* The Registrar, High Court of Judicature, Appellate Side, Mumbai,
* The Registrar, Loka Ayukta and Upa-Loka Ayukta, Mumbai,
* The Secretary, Maharashtra Public Service Commission, Mumbai,
* The Secretary, Maharashtra Legislature Secretariat, Mumbai,
* The Accountant General, Maharashtra 1/2 (A and E), Mumbai/Nagpur,
* The Accountant General, Maharashtra 1/2 (Audit) Mumbai/Nagpur,
All Divisional Commissioners,
All Collectors,
The Chief Executive Officers of all Zilla Parishads,
The Resident Audit Officer, Maharashtra State, Mumbai,
All Departments of Mantralaya, Mumbai,
All Head of Departments and Office under the several Departments of the Mantralaya,
All Desk of the General Administration Department,
Select File.

* Letters.

M. V. KOKANE,
Joint Secretary to Government.